# एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी मराठी साहित्य

**प्रा. डॉ. उल्हास मोगलेवार**

मराठी साहित्यात 1960 नंतर अनेक बदल घडून आले. 1960 नंतरचे मराठी साहित्य खऱ्या अर्थाने उपेक्षितांचे जीवन चित्रण करणारे आणि उपेक्षितांच्या वेदना प्रभावीपणे मांडणारे साहित्य ठरले. दलित, ग्रामीण आदिवासी, जनवादी, खिश्चन, मुस्लिम, स्त्रीवादी अशा अनेक विचारधारा मराठी साहित्याला मिळाल्या मध्ययुगीन कालखंडातील स्त्री संत महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई आजच्या कालखंडातील लेखिका मेघना पेठे सानिया कविता महाजन यांच्यासारख्या लेखिकांनी मराठी साहित्याला आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. 1960 नंतर ललित साहित्य आणि वैचारिक साहित्य या दोन्ही साहित्य प्रकारांमध्ये अनेक स्त्रियांनी लेखन केले. वैचारिक साहित्यात प्रामुख्याने स्त्री शिक्षण, दलित, ग्रामीण आणि मुस्लीम या तळागाळातील स्त्रियांच्या समस्या याविषयी हे लेखन झालेले दिसून येते.

स्त्रीवादी चळवळ ही स्त्रियांना मानवी हक्क मिळवून देणारी चळवळ आहे. परंतु आज देखिल समाजात असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे ज्याविरूद्ध स्त्रियांना चळवळ उभारावी लागते आहे. स्त्रीभ्रूण हत्या, आंतरजातीय, आंतरधर्मिय विवाहाला होणारा विरोध, हुंडाबळी, मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न, बलात्कारित स्त्रियांच्या वेदना, वेश्यांचे प्रश्न, नौकरीच्या क्षेत्रात स्त्रियांना दिली जाणारी दुयम वागणूक त्यांचे लैगिक भोषण या सर्वच प्रश्नांचे स्त्री जीवनावर विघातक परिणाम झाले असल्यामुळे स्त्रियांनी त्याचे चित्रण कशाप्रकारे केले या सर्व प्रश्नांचा विचार करणेसुद्धा आवश्यक आहे. स्त्री लेखिकांच्या अनुभवविश्वाचे चित्रण साहित्यातून होतच असते परंतु त्याला सुद्धा मर्यादा असतात. परंतु काही लेखिकांनी मर्यादेच्या बाहेर निघून लेखन केलेले आढळून येते. सामाजिक, कौटुंबिक व वैवाहिक जिवनात स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यमत्वांच्या विरोधातला संघर्ष त्यांनी साहित्यात मांडला आहे. महाराष्ट्रात 1975 नंतर स्त्रीवादी चळवळीला सुरवात झाली. स्त्रीवादी संघटनांनी चालवलेली मुखपत्रे, नियतकालिके याच काळात सुरू झाली. स्त्रीयांमध्ये जागृत झालेले आत्मभान आणि स्त्रीमुक्तीसाठी झालेले प्रयत्न साहित्यात दिसून येतात.

''अमेरिकन स्त्री स्वातंत्र्याचा इतिहास पाहिला तर अमेरिकन स्त्री ही नशीबवान होती असे म्हणावे लागते. तरी सुद्धा मानव म्हणून आपले हक्क मिळविण्यासाठी अमेरिकन स्त्रियांनाच जास्तीत जास्त लढा द्यावा लागला. उच्च शिक्षण घेण्याचा हक्क, करियर करण्याचा हक्क, मतांचा हक्क याची मागणी करणाऱ्या स्त्रीवाद्यांची निर्भत्सना केली गेली व पुरूषांच्या मत्सरातून जन्माला आलेल्या विकृतीचे बळी अशी त्यांची संभावना झाली. स्त्री म्हणून लैंगिक समागमात निष्क्रीय सहभाग घेणे. पुरूषांचे वर्चस्व मान्य करणे. आई म्हणून मुलांना जन्म देऊन त्यांचे पालनपोषण करणे एवढेच स्त्रीचे कार्यक्षेत्र आहे आणि स्त्रीवाद्यांची मागणी ही स्त्रियांच्या या नैसर्गिक स्वभावाला धरून नाही असा युक्तिवाद करण्यात आला.''[1] स्त्रीवादी चळवळीतील मेरी वुलस्टोन क्राफ्ट किंवा तिच्या अन्य सहकारी स्त्रिया या सुखी समाधानी वैवाहिक जीवन जगणाऱ्या होत्या सुझन ॲन्थनीसारख्या ज्या अविवाहित होत्या. त्या पुरूषांशिवाय स्त्रियांच्या व्यक्तित्वाला परिपूर्णता येऊ भाकते, व्यक्ती म्हणून त्या वाढू शकतात आणि प्रेमाइतकीच माणसासारखं जगण ही स्त्रीची भूक आहे हे सिद्ध करणाऱ्या होत्या.

''1879 मध्ये इब्सेनने आपल्या 'डॉल्स हाऊस' या नाटकात नोराच्या रूपाने स्त्रीच्या माणूसपणाची जरूरी व्यक्त केली. युरोप आणि अमेरिकेतल्या हजारो स्त्रियांनी यावेळी स्वतःला नोराच्या रूपात पाहिले. यापूर्वी 1948 मध्ये न्यूयार्क येथे 'द फर्स्ट वुमेन्स राईट्स कन्व्हेन्शन' मध्ये स्त्रियांच्या गुलामगिरीविरूद्ध कडक भाब्दात चीड व्यक्त करण्यात आली होती आणि यानंतरच स्त्रियांनी आपल्या दुय्यमत्वाबद्दल आवाज उठवला होता. अमेरिकेतील स्त्रियांच्या स्वातंत्र्याची चळवळ, गुलामगिरी न करण्याच्या चळवळीशी समांतर राहिली हा योगायोग नव्हता. माणूस म्हणून जगण्याच्या नाकारल्या जाणाऱ्या हक्काविरूद्धचेच हे दोन्ही लढे होते.''[2]

सनातन वाद्यांच्या पोथ्यापुराणातून स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे दाखले देणाऱ्या धर्मगुरूविरूद्ध स्त्रियांना लढावे लागले 'ॲडम वॉज फर्स्ट बॉर्न देन् इव्ह' अशा कित्येक वचनांनी स्त्रीची कोंडी करण्यात आणि स्त्रीया या घरादारांची राखरांगोळी करित आहे व पुरूषांना आपला गुलाम बनवू पाहात आहे अशाप्रकारच्या धार्मिक बुरख्याखाली चाललेल्या अपप्रचारांना स्त्रीवाद्यांना सामोरे जावे लागले.

''विसाव्या भातकात मतांच्या लढ्यापेक्षा वंशभेदाचा लढा सामाजिक सुधारणेचा लढा आणि कामाच्या ठिकाणी असलेल्या वाईट परिस्थितीचा लढा हे अधिक उग्र होते. पण तरीही महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या तरूणींनी आपला मतांसाठीचा लढा जोमाने पुढे रेटला.''[3]

एकविसाव्या भातकाच्या मध्यानंतर विकसित होणाऱ्या सामाजिक चळवळीचा आढावा घेतला तर अभ्यासकांपुढे काही भाब्दाचे अर्थ स्पष्ट होणे गरजेचे आहे. फिमेल म्हणजे स्त्री. फेमिनिझम म्हणजे स्त्री प्राधान्य व फेमिनिस्ट म्हणजे स्त्रीवादी होय स्त्री ही स्त्री आहे म्हणून ती स्त्रीवादी होत नाही. स्त्रियांनी लिहिलेली स्त्रियांची पुस्तके स्त्रीवादी ठरत नाहीत. स्त्रियांनी स्त्रियांवर लिहिलेली पुस्तके पुरूष–प्रधानतेला आव्हान देणारी असतात असेही नाही. उलट पुरूषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या भाषिक व वाङ्मयीन ढाच्यातच बऱ्याच स्त्रिया लेखन करताना दिसतात. त्यामुळे स्त्री साहित्याची वाङ्मयीन परंपरा स्त्रीवादी म्हणता येत नाही. पितृप्रधान संस्कृतीने स्त्रियांच्या अनुभवांना अनेकदा दाबून टाकलेले आहे. म्हणून स्त्रियांनी साहित्यातून आपले अनुभव व्यक्त करणे हा पितृप्रधान

व्यवस्थेविद्धचाच एक डावपेच आहे 'जाणीव जागृती' हा स्त्री चळवळीचा मुख्य आधार असल्यामुळे अशा 'खास' अनुभवांना अविष्कृत करणारे साहित्य हे स्त्रीवादी मानले जाऊ लागले.

''महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचा वेध घेतांना पश्चिमात्य विचारधारेचा महाराष्ट्रावर पडलेला प्रभाव त्याचबरोबर महाराष्ट्राची पूर्व परंपरा आणि त्या पूर्व परंपरेतून टिकून राहिलेले अनेक संकेत आणि परंपरा यांचाही विचार करावा लागतो स्त्रीमुक्तीचा विचारप्रवाह आणि मराठी साहित्यातील स्त्रियांचे कर्तृत्व यांचा विचार करतांना मध्ययुगीत कालखंडात महाराष्ट्रातील स्त्री संताचे कार्य लक्षात घेणे आवश्यक आहे. मध्ययुगीन कालखंडात चक्रधर, ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंत संतानी आध्यात्मिक क्षेत्रात लोकशाहीची स्थापना केली. वर्णभेदाबरोबर लिंगभेद त्यांनी फेटाळला त्यामुळे स्त्रिया महानुभाव पंथ आणि वारकरी पंथ या धर्मसंप्रदायामध्ये सहभागी झाल्या. तरीसुद्धा तत्कालीन काळातील सामाजिक विषमतेला स्त्रियांना तोंड देता आले नाही. या पार्श्वभूमीवर महानुभाव संप्रदायातील महदाईसा, वारकरी संप्रदायातील मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा यांचे कार्य समजून घेतले असता सामाजिक क्षेत्रामध्ये जी मुक्तीची संकल्पना समाजाला मान्य नव्हती, ती मुक्तींची संकल्पना या स्त्रियांनी आध्यात्मिक क्षेत्रात शक्य करून दाखविली. तो स्त्री मुक्तीचा कणखर असा आद्य स्वर होता.''[4] त्यानंतर मराठेशाहीच्या कालखंडात हिंदू–मुस्लीम युद्धाच्या कालखंडात स्त्रियांची झालेली अवहेलना. पेशवाईत स्त्रियांची झालेली अवनती हा इतिहास स्त्रियांच्या परवशतेची साक्ष देणारा आहे. ब्रिटीश कालखंड हा स्त्रियांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारा कालखंड ठरतो. या कालखंडात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी तळागाळातील स्त्री–पुरूषांचे प्रश्न समाजाच्या अग्रभागी आणले. स्वातंत्र्यपूर्व काळात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे या स्त्रियांनी सामाजिक चळवळीत आपले योगदान दिले.

1975 पासून अनेक स्त्रीवादी संघटना कार्यरत झाल्या. या संघटनांनी नियतकालिकांची सुरवात केली 1832 पासून बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण' सुरू झाले दर्पण नंतर 'धूमकेतू' व 'ज्ञानदर्शन' या नियतकालिकांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान मराठी साहित्याला दिले. आगरकरांनी 'सुधारक' काढून स्त्री सुधारणेचा पुरस्कार केला. लोकहितवादींनी 'शतपत्रे' लिहून स्त्रियांच्या अवहेलनेवर नेमके बोट ठेवले. डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' आणि मूकनायक' द्वारे समाजात जागृती करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात निघालेली नियतकालिके, वृत्तपत्रे विशिष्ट ध्येयाने प्रेरित होती.

1975 नंतर स्त्रीवादी चळवळीत जे नवे आत्मभान निर्माण झाले. त्याला खतपाणी देण्याचे कार्य स्त्रीवादी नियतकालिकांनी केले. समग्र स्त्री प्रश्नांचा विचार करून स्त्रियांचे प्रश्न बौद्धिक पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला मराठीतील स्त्रीवादी नियतकालीकांचा आढावा घेतला असता बायजा–सौदामिनी राव, प्रेरक ललकारी – शारदा साठे, महिला आंदोलन पत्रिका – मिनाक्षी साने, मिळून साऱ्याजणी – विद्याबाळ, प्रतिबिंब – प्रतिभा कुळकर्णी, आम्ही मैतरणी – मीनाक्षी मून, डॉ. निलम गोऱ्हे – आम्ही स्त्रिया, सुमन बंग – सखी यासारखी स्त्री प्रश्नांना प्राधान्य देणारी नियतकालिके मराठीत निर्माण झाली. या सर्व नियतकालिकांच्या संपादकपदी स्त्रिया होत्या.

''1975 पासून सुरू झालेल्या नियतकालिकांचा प्रवास सन् 2000 पर्यंत व्यापक झालेला दिसून येतो. जागतिकीकरण, खाजगीकरण, धार्मिक, जातीय दंगलीमुळे विस्कळीत झालेले जनजीवन पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे निर्माण झालेले प्रश्न, स्त्रियांच्या अत्याचारात झालेली वाढ, बलात्कार, हत्या, खून, दरोडे अशा अनेक प्रश्नांना नियतकालिकांनी हाताळले याबरोबरच साहित्याबरोबर स्त्रियांचे बदलते भावविश्व, त्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन यांचा देखिल विचार नियतकालिकांमध्ये करण्यात आला.''[5]

1960 ते 2011 या पन्नास वर्षांच्या कालखंडात साहित्यात अनेक बदल होत गेले. या बदलाची चिकित्सा केली असता पारंपारिक साहित्य निर्मितीची मूल्ये आणि स्त्रीवादी नव्या जाणिवेची मूल्ये यांचा संघर्ष स्त्रियांच्या साहित्यात उमटलेला दिसून येतो. 1975 नंतर लेखन करणाऱ्या लेखिकांच्या साहित्यातून काही स्त्रीवादी मूल्ये प्रखरपणे समोर आलेली दिसतात यात गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, प्रिया तेंदुलकर, कविता महाजन यासारख्या लेखिकांच्या कथा कादंबऱ्यातून हा दृष्टीकोन प्रगट झालेला दिसून येतो कथा कादंबरीप्रमाणे कवितेच्या क्षेत्रातही मल्लिका अमर ेख, रजनी परुळेकर, अनुराधा पाटील, प्रभा गणोरकर, संध्या रंगारी पर्यंत अनेक कवयित्रींनी माणूस म्हणून जगण्याची आपली आस स्पष्ट केली. आत्मचरित्राच्या क्षेत्रात मल्लीका अमर शेख, सुनिता देशपांडे, उर्मिला पवार यांनीसुद्धा ही जाणीव मांडण्याचा प्रयत्न केला. 1960 नंतर कथेच्या क्षेत्रात स्त्रियांनी फार मोठे योगदान दिलेले आहे. यापूर्वीच्या काळात स्त्रियांद्वारा मनोरंजनात्मक कथेची निर्मिती मोठ्याा प्रमाणावर झाली. या काळात स्नेहलता दसनूरकर, भौलजा काळे, भाकुंतला गोगटे, वसुंधरा पटवर्धन या लेखिका 1960 पर्यंत कथा लेखन करीत होत्या. 1960 नंतर ज्योत्स्ना देवधर, विजया राजाध्यक्षा, आशा बगे, कमल देसाई, अरुणा ढेरे या सारख्या लेखिकांनी कथेच्या क्षेत्रात आपले महत्वपूर्ण योगदान दिले. या काळात स्त्रियांच्या अनुभवविश्वांची सूत्रे बदललेली दिसतात. जगाकडे उघड्याा डोळ्यांनी बघतांना आलेले अनुभव या कथांमधून चित्रित झालेले दिसतात.

''1975 नंतर भारतीय समाजजीवनात जी स्थित्यंतरे होत गेली. समाजवास्तव बदलत गेले त्याचेही प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष परिणाम या काळातील कवितेवर होत गेलेले दिसतात आणि ते नव्या पिढीच्या कवयित्रीच्या कवितेतूनच दिसतात असे नाही तर 1960 पर्यंतच्या काळात सुप्रसिद्ध झालेल्या इंदिरा संत, शांता शेळके, शिरिष पै इत्यादि कवयित्रींच्या कवितेतूनही जाणवतात.''[6]

कथा आणि कवितेप्रमाणे कादंबरीच्या क्षेत्रात सुद्धा स्त्री लेखिकांनी आपली महत्वपूर्ण कामगिरी बजावली झाले.

त्याचे प्रतिबिंब स्त्री लिखित कादंबऱ्यामधूनही उमटले. ऐतिहासिक, पौराणिक, अस्तित्ववादी, ग्रामीण प्रादे ाक अशा विविध प्रवाहांमध्ये स्त्रियांनी कादंबऱ्यांची निर्मिती केलेली दिसते. स्त्रियांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन प्रभावीपणे साहित्यनिर्मिती करणाऱ्या लेखिका म्हणून विभावरी शिरुळकर यांचा गौरव केला जातो. साठोत्तरी कादबरीच्या प्रवाहात ज्योत्स्ना देवधर यांचे योगदान महत्वाचे आहे. 'घर गंगेच्या काठी', 'कल्याणी' या कादंबऱ्यामधून त्यांनी स्त्रियांचे सामाजिक स्थान शोधण्याचा प्रयत्न केला. 1986 मध्ये प्रकाशित झालेल्या कल्याणी या कादंबरीत भाापामुळे कुटुंबाची होणारी वाताहत स्पष्ट केली. याच काळात मालती दांडेकर, योगिनी जोगळेकर, शैलजा राजे, कुमुदिनी रांगणेकर या लेखिका मोठ्याा प्रमाणात मनोरंजन प्रधान कांदकऱ्याची निर्मिती करीत होत्या. शकुंतला गोगटे यांच्या पंचवीसपेक्षा जास्त कादंबऱ्या प्रकाशित झाल्या त्यांच्या कादंबऱ्या मनोरंजनप्रधान गटात मोडतात. त्यांच्या कादंबऱ्याविषयी भालचंद्र फडके यांनी म्हटले आहे. ''स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक–दोन अपवाद वगळले तर आपण कादंबऱ्यातून स्त्रियांच्या समस्या मांडाव्या असे मराठी लेखिकांना वाटत नाही. कादंबरी ही वाचकांचे केवळ रंजन करण्यासाठी अवतरते या समजुतीने या लेखिकांना एवढे झपाटून टाकले आहे की 'उपजिविकावादी' कादंबऱ्यांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करण्यात त्यांची भाक्ती खर्च होत आहे. फडकेप्रणीत कादंबऱ्यांची अनुकरण करीत अनेक स्त्रिया यांत्रिक कादंबरीची नित्य भर टाकत आहेत. नावे गावे बदलायची व तोच तो प्रेमाचा त्रिकोण रंगवायचा आणि अ ाा त्रिकोणी कादंबरीतून चुंबने, आलिंगने, रडारड, उसासे इ. चघळत चघळत वर्णने करत राहिल्यामुळे कादंबरी बाजारात येईल पण ती वाचून वाचक निरा ाच होणार.''[7]

1960 नंतर मराठी साहित्यात पौराणिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या सुमत्री क्षेत्रमाडे, रेखा बैजल, सुमती इनामदार, आशा बगे, अरुणा ढेरे, लीला दिक्षीत यासारख्या लेखिकांनी पौराणिक कादंबऱ्यांची निर्मिती केली. ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात स्त्रियांचे योगदान नगण्य आहे. प्रतिमा इंगोले यांच्या 'बुढाई' या कादंबरीचा उल्लेख या संदर्भात करता येतो. संज्ञाप्रवाही कादंबरीच्या क्षेत्रात कमल देसाई यांनी आपले वैशिष्टपूर्ण स्थान निर्माण केले. काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई या कादंबऱ्यांमधून स्वयंपूर्ण स्त्रीचे चित्रण केले. 1975 नंतर गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, कविता महाजन अशा काही लेखिकांनी आपल्या कादंबरीतून आत्मनिर्भर स्वतंत्र स्त्रियांचे चित्रण केले.

1960 नंतर दलित लेखिकांनी आत्मचरित्राच्या क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमठविला. शांताबाई कांबळे, कुमुद पावडे, मुक्ता सर्वगौंड, बेबी कांबळे, मलिका अमर शेख, उर्मिला पवार यांचा या संदर्भात विचार करता येईल. कवितेच्या क्षेत्रात दलित कवयित्रींनी आपली वेदना प्रभावीपणे अभिव्यक्त केली आहे.

स्वातंत्र्यापासून 1960 पर्यंतचा काळ हा सामाजिक आणि साहित्यिक दृष्ट्यादेखील स्थितीशील कालखंड आहे. 1960 नंतर परत सामाजिक, साहित्यिक घडामोडींना वेग आलेला दिसतो. ग्रामीण साहित्य चळवळ, स्त्रीवादी साहित्य चळवळ, दलित साहित्य चळवळ 1960 नंतर या गतिशील झालेल्या दिसतात. या काळात स्त्रिया मोठ्याा प्रमाणात लिहू लागल्या परंतु हे सगळे साहित्य स्त्रीवादी आहे असे म्हणता येत नाही. 1975 नंतर युनोने जाहीर केलेल्या स्त्री दशकाच्या निमित्ताने झालेली जनजागृती जगभरातल्या स्त्रियांसाठी महत्वपूर्ण ठरली. स्त्रियांमध्ये माणूसपणाचे सजग भान 1975 नंतर विशेषत्वाने जागृत झाले. विविध स्वायत्त संघटनांची निर्मिती ही चळवळीसाठी एक महत्वपूर्ण जमेची बाजू होती. सुशिक्षित आणि उच्च वर्गातील स्त्रिया स्वतःबद्दल सजगतेने विचार करु लागल्या. आपल्या अधिकारांसाठी त्या आक्रमक झाल्या. हुंडाबळीच्या विरोधात आंदोलनाची निर्मिती याच काळात झाली. महागाई आणि पाणी प्रश्न याविरुद्धही मोर्चे, आंदोलने उभारण्यात आली. याच काळात समाजव्यवस्थेत अनेक नवे प्रश्न निर्माण झाले. जागतिकीकरण आणि खाजगीकरण यामुळे लघुउद्योगावर संक्रांत आली. विस्थापितांचे प्रश्न निर्माण झाले. दूरदर्शनाच्या माध्यमातून सादरीकरणाला अवाजवी महत्व प्राप्त झाले. एकीकडे स्त्रीचळवळ गति ील झाली तर दुसरीकडे स्त्रिया अधिक खालच्या वर्गाकडे फेकल्या गेल्या. या काळात गती ील झालेली स्त्रीवादी चळवळ व या चळवळीची मूळ भूमिका या भूमिकेला साहित्यातून व्यक्त करण्याचे प्रयत्न काही मोजक्या स्त्रियांनी केलेले दिसतात. 1990 नंतर जागतिकीकरण, खाजगीकरणामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण झाले. मानवी मूल्यांची प्रचंड हानी झाली. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान अधिक खालावले. या प्रश्नांचे विवेचन मराठी स्त्री लिखित साहित्यात फारसे दिसून येत नाही. आजही अनेक नवी आव्हाने, नवे प्रश्न आ वासून उभे आहेत. अनेक नव्या समस्या निर्माण झाल्या आहेत या सर्व प्रश्नांचे, समस्यांचे आव्हानांचे चित्र मराठी स्त्री साहित्यात उमटणे आवश्यक आहे.

**संदर्भ टीपा :**

1. *डॉ. अश्विनी धोंगडे – ''स्त्रीवादी समीक्षा, स्वरुप आणि उपयोजन'', प्रथम आवृत्ती, पुणे 1993. पृ. क्र. 7.*
2. *तत्रैव पृ.क्र. 8*
3. *तत्रैव पृ.क्र. 10*
4. *डॉ. वंदना महाजन, ''स्त्रीवाद आणि मराठी साहित्य'', प्रथम आवृत्ती, नागपूर, 2013, पृ.क्र. 13*
5. *तत्रैव पृ.क्र. 37*
6. *मंदा खांडगे, संपादक ''स्त्री साहित्याचा मागोवा'' खंड 2, पृ.क्र. 68*
7. *भालचंद्र फडके, ''मराठी लेखिका चिंता व चिंतन'' पृ.क्र. 216–217.*